# उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम योजना

सदरची योजना राज्यशासनाची योजना असून राज्यातील सामान्य, सर्वसाधारण या प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगारांना राज्यशासनाने पुरस्कृत केलेल्या मिटकॉन कन्सल्टन्सी सर्विसेस लि.,/महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, या मान्यताप्राप्त संस्थामार्फत उद्योजकता प्रशिक्षणाचे काम करण्यात येते.

## योजनेचा उध्देश

सामान्य, सर्वसाधारण प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगारांना उद्योजकता विकास आणि तांत्रीक प्रशिक्षण देवून स्वयंरोजगारासाठी त्यांची तयारी करणे.

## प्रशिक्षण देणारी संस्था

१.मिटकॉन कन्सल्टन्सी सर्विसेस लि.,
२.महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र.
३.शासनाने मान्यता दिलेली अन्य सक्षम प्रशिक्षण संस्था
४.महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र

(प्रशिक्षण देणारी संस्था किमान ५ वर्षापासून उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे क्षेत्रात काम करणारी मान्यता प्राप्त असावी. संस्थमध्ये उद्योजकता प्रशिक्षण क्षेत्रातील केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेमधून प्रशिक्षण घेतलेले प्रेरक प्रशिक्षक असावेत व त्यांचेकडे प्रशिक्षण देणेकरीता आवश्यक त्या सुविधा असाव्यात.)

## अंमलबजावणी यंत्रणा

१.महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
२.योजनेअंतर्गत इच्छुक प्रशिक्षणार्थिची निवड आणि पाठपुरावा करण्याकरीता जिल्हास्तरीय समिती.

## कार्यपध्दती

सदर योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांची निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे एक कार्यबल समिती असे.

१.महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र-----------------------------अध्यक्ष
२.जिल्हा समाजकल्याण अधिकारी------------------------------उपाध्यक्ष
३.जिल्हयातील अग्रणी बँकेचे प्रतिनिधी----------------------------सदस्य
४.प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, ------------निमंत्रक
५.मिटकॉन किंवा शासनमान्य प्रशिक्षण संस्था-------------------निमंत्रक

*सदर कार्यबल समिती, लाभार्थि उद्योग, व्यवसाय उभारणेसाठी कर्ज/अनुदान मिळणेकरीता कोणत्या योजनेत पात्र आहे याबाबत मार्गदर्शन करेल.

*प्रशिक्षणार्थिंना प्रकल्प उभारणीकरीता कार्यबल समितीचे घटक संयुक्तपणे प्रयत्न करतील.

*मिटकॉन कन्सल्टन्सी सर्विसेस लि., महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, व अन्य मान्यता प्राप्त संस्थांनी कार्यबल समितीने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत. सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रशिक्षक संस्थेने जिल्हा रोजगार स्वयंरोजगार मार्गदर्शन कार्यालयात उपलब्ध असलेल्या यादीतून प्रशिक्षणार्थिंचे अर्ज मागवावेत. सदर अर्जाद्वारे उपलब्ध होणा-या कमाल ३० ते ४० प्रशिक्षणार्थिची निवड करण्यासाठी एक दिवसाचे उद्योजकताबाबत जागृती मेळावे घ्यावेत. सदर जागृती मेळाव्यास मुलाखतीकरीता व प्रशिक्षणाकरीता येणा-या लाभार्थिस कोणत्याहि प्रकारचा प्रवास, दैनिक भत्ता देय नाही.

*उमेदवाराची निवड करताना कार्यबल समिती महिलांना तसेच भुमिहिन शेतक-यांना प्राधान्य देईल.

*प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन, समन्वय व पाठपुरावा संबंधित प्रशिक्षण संस्था करतील.

**लाभार्थिची पात्रता**

*उमेदवार किमान ७ वी पास, किंवा पदवी, पदवीका, आयटिआय प्रमाणपत्र किंवा किमान कौशल्यावर आधारित व्यावसायीक अभ्यासक्रम प्रमाणपत्र धारक असावा.

*उमेदवाराचे वय १८ ते ४५ असावे.

*उमेदवार कोणत्याहि संस्थेचा थकबाकीदार नसावा.

**योजनेअंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम खालीलप्रमाणे असतील.**

१. **उद्योजकता परिचय कार्यक्रम..(१ दिवस, अनिवासी)**

एक दिवसाच्या परिचय कार्यक्रमांतर्गत व्यवसायाची निवड, उद्योजकीय व्यक्तीमत्व विकास, व्यवसाय व्यवस्थापन, शासनाच्या विविध संस्था व अर्थसहाय्य देणा-या संस्था व त्यांचे मार्फत राबविल्या जाणा-या योजनांची माहिती ,बाजारपेठ पहाणीबाबत सर्वसामान्य माहिती इत्यादिचा समावेश राहिल.

प्रति कार्यक्रम रु.६००/- इतका खर्च प्रशिक्षक संस्थेस करता येईल.

प्रशिक्षणार्थ्याकडून या कार्यक्रमासाठी शुल्क आकारण्यात येणार नाही. सदर उद्योजकता परिचय कार्यक्रम मिटकॉन कन्सल्टन्सी सर्विसेस, महाराष्ट्र उद्योजकता विकास प्रशिक्षण केंद्र, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, घेवू शकतील.

२. **उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (१२ दिवस, निवासी)**

छोटया उद्योजकास, उद्योग व व्यवसाय उभारताना अनेक प्रकारच्या अडचणी भेडसावतात त्यावर मात करण्याकरीता प्रशिक्षणाद्वारे माहिती अगोदर मिळाल्यास तो उद्योग/व्यवसाय उभारण्यास सक्षम होईल. प्रशिक्षणाच्या आर्थिक व तांत्रिक बाबींचा विचार करुन प्रशिक्षण १२ दिवसाचे निवासी व भोजन व्यवस्थेसह असेल. यासाठी प्रति प्रशिक्षणार्थि रु.४०००/-या कमाल मर्यादेपर्यन्त रक्कम प्रशिक्षण संस्थेस अनुज्ञेय राहिल.

निवासी कार्यक्रमाच्या अनुषंगाने निवडलेल्या प्रशिक्षणार्थिना खालीलप्रमाणे उद्योगाशी संबंधित कला गुणांचा विकास व माहिती मिळण्याचा प्रशिक्षणात प्रामुख्याने समावेश करण्याची जबाबदारी प्रशिक्षण संस्थेवर असेल.

* **प्रशिक्षणाचे विषय**

♠उद्योजकतेकरीता आवश्यक असलेले गुण व उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास

♠अर्थ सहाय्य देणा-या विविध संस्था व त्यांचे अर्थसहाय्य मिळण्याकरीता कार्यप्रणाली

♠मागणी/बाजारपेठ सर्वेक्षण कसे करावे

♠विविध उद्योगांमध्ये उपलब्ध असलेल्या संधी

♠व्यवसायाशी संबंधित कायदे व त्याकरीता अवलंबविण्याची कार्यपध्दती

♠व्यवसाय उभारणीस येणा-या अडचणी व त्यांचे निराकरण कसे करावे

♠हिशेब व इतर लेखा विषयक बाबी

♠पणन व्यवस्थापन

♠उद्योगांना प्रत्यक्ष भेटी व उद्योजकांचे अनुभव

♠प्रकल्प अहवाल तयार करणे व त्यांचे विश्लेषण

♠आवश्यकतेनुसार इतर विषय

३. **तात्रिक प्रशिक्षण कार्यक्रम (१५ दिवस ते २ महिने, अनिवासी)**

- या प्रशिक्षणात उत्पादन/सेवा उद्योगांशी निगडीत असलेल्या प्रकारामध्ये तांत्रिक कौशल्य वाढविणे, नविन माहिती देणे इत्यादिंचा अंतर्भाव असेल. लाभार्थ्यांना स्वतंत्रपणे तो व्यवसाय करणेकरीता आत्मविश्वास प्राप्त होईल इतपत प्रात्यक्षिके व प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणार्थिंना मिळण्याचेदृष्टीने प्रशिक्षणाचे स्वरुप ठेवण्यात येईल.

- खालील व्यवसायांचा मुख्यत: तांत्रिक शिक्षण व उद्योजकतेच्या प्रशिक्षणात समावेश राहिल.

♠फॅशन डिझायनिंग व विणकाम

♠बेकरी

♠दुचाकी वाहन दुरुस्ती

♠शिवणकाम

♠डिटिपी आणि स्क्रीन प्रिन्टींग

♠फोटोग्राफी आणि व्हीडिओ शुटिंग

♠टाय ॲण्ड डाय, बटिक पेंन्टींग

♠बंदिस्त शेळी पालन

♠ब्युटिपार्लर

♠फळप्रक्रिया

♠संगणक जोडणी, दुरुस्ती व देखभाल
♠आयुर्वेदिक वनस्पती लागवड व प्रक्रिया
♠मल्टी परपज मॅकेनिक
♠नर्सरी व्यवस्थापन
♠घरगुती उपकरणे दुरुस्ती व देखभाल
♠कॅटरिंग व इतर व्यवसाय

इतर उद्योग/सेवा उद्योग (कार्यबल समिती ठरवून देईल त्याप्रमाणे)

*या व्यवसायाव्यतिरिक्त जिल्हयातील गरज व प्रशिक्षण संस्थेच्या क्षमतेनुसार कार्यबल समितीचे मान्यतेने व वाव असलेल्या इतरही व्यवसायांचे तांत्रिक प्रशिक्षण देता येईल व हे प्रशिक्षण अनिवासी असेल.

*प्रशिक्षक संस्था, १५ दिवस, १ महिना व दोन महिन्यांचा तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रत्येक सामान्य प्रशिक्षणार्थिस अनुक्रमे रु.५००/- , रु.१०००, व रु.२०००/- विद्यावेतन देईल. प्रशिक्षण संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थि रु.३०००/- प्रति महा अदा करता येईल.

*महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, हे योजनेवर नियंत्रण ठेवतील.

*प्रशिक्षण कार्यक्रमाची सुधारणा व योग्य अंमलबजावणी होणेसाठी सदर योजनेचे जिल्हास्तरावर नियतकालीन मुल्यांकन करण्यात येईल.

*या योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थिने घेतलेल्या प्रशिक्षणाचा परिणाम मुल्यमापन नियतकालीकरित्या स्वतंत्रपणे जिल्हास्तरावर करण्यात येईल.

*उद्योजकता विकास प्रशिक्षण व तांत्रिक कौशल्य विकास प्रशिक्षणात एकाच वेळेस जास्तीत जास्त ३० ते ४० प्रशिक्षणार्थि घ्यावेत.